रे.दि.मु.नं. २२९/२०१४ मधील नि. ६० खालील आदेश
( शोभावती वाघमोडे व इतर वि. शिवाजी भगवान पाटील व इतर )

**CNR No.MHSO20-000935-2014**

प्रस्तुत कामी वादी क्र. ३ यांचे वारसातर्फे अर्ज की, प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द निरंतर ताकीद मिळण्यासाठी दाखल केला असुन दावा चालू असताना वादी क्र. ३ तारामती रामचंद्र भंडारे ही दि. २६/०८/२०२० रोजी मयत झालेली आहे. सदर वादी क्र. ३ यांचे वादी क्र. ३–अ ते ३–इ असे कायदेशीर वारस आहेत. त्यांना हा दावा महत्वाचा असुन व स्थावर मिळकतीचा असल्यामुळे वादी क्र. ३ हिच्या मृत्यूनंतर हे तिचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना दावा चालविण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. सदरचा दावा, वादी क्र. ३ चे वारस म्हणून चालविण्यास ते तयार आहेत. त्यामुळे त्यांना वादी क्र. ३ चे वारस म्हणून दाव्यामध्ये समाविष्ट करण्यास व तशी दाव्याच्या सरनाम्यात दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळणेविषयी विनंती केली आहे.

२. सदरच्या अर्जावर प्रतिवादीतर्फे म्हणणे देण्यात आले असुन त्यांनी सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असल्याने तो नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जावर वादी–प्रतिवादी यांचे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. यामध्ये वादींचे कथनानुसार दावा चालू असताना वादी क्र. ३ तारामती रामचंद्र भंडारे ही दि. २६/०८/२०२० रोजी मयत झालेली आहे. सदर वादी क्र. ३ यांचे वादी क्र. ३–अ ते ३–इ असे कायदेशीर वारस

आहेत. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतरची ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी वादींचे वारस समाविष्ट करुन घेणे आवश्यक आहे. सदरचा अर्ज मुदतीमध्ये दाखल केलेला आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१) अर्ज (नि.६०) मंजुर करण्यात येतो.

२) वादी क्र. ३ चे वारस दाव्यामध्ये समाविष्ट करुन दुरुस्त दाव्याची प्रत वादींचे वारसांनी १४ दिवसांचे आत दाखल करावी.

SEEMA KETAN DESHMUKH

Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2022.07.16 11:19:57 +0530

सांगोला.
दिनांक –१५/०७/२०२२

( सौ. एस. के. देशमुख )
दिवाणी न्यायाधीश क. सतर,
सांगोला.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S. P. Parekar |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Civil Judge, J.D.& J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 15/07/2022 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 15/07/2022 |